# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### लाडघर ( भंडारवाडा ), ता.दापोली, जि.रत्नागिरी येथील अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेबाबत

**(१) २८८२१ (१५-०६-२०२१). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाडघर (भंडारवाडा), ता.दापोली, जि.रत्नागिरी येथील ग्रामीण मार्ग क्रमांक २४७ वर व परिसरात शासकीय जागेवर पक्क्या स्वरुपात झालेली अनधिकृत बांधकामे काढून टाकण्यासंदर्भात मा.ग्रामविकास मंत्री यांनी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास संबंधित प्रशासनास सदरहू अनधिकृत बांधकामे ८ दिवसात निष्कासित करण्याबाबत आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बांधकामे अद्यापही निष्कासित झाली नसल्याचे निदर्शनास आले असून संबंधित प्रशासन व अनधिकृत बांधकाम धारक यांचे अर्थपूर्ण व्यवहार असल्याने सदरहू बांधकामे निष्कासित करण्यात आली नाहीत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन बांधकामे निष्कासित करण्यासह सदरहू बांधकामास संरक्षण देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही,

(२) व (३) अंशत: खरे आहे,

ग्रामपंचायत लाडघर मालकीच्या रस्त्यावर अतिक्रमण काढून टाकणे बाबत प्रत्यक्ष कारवाई सुरु झालेवर एक बाजूचे भिंतीचे बांधकाम काढून टाकले परंतु अतिक्रमण करणारे डॉ.योगेश चंद्रकांत मोकळ यांनी दापोली जि.रत्नागिरी येथील सिव्हील जज्ज यांचे कोर्टात रे.मु.नं. ९१/२०२३ दि. २७/०७/२०२३ अन्वये प्रतिवादी विरुद्ध दावा दाखल केलेला असून, सदर दाव्या प्रकरणी मा. न्यायालयाने आहे तशी परिस्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे सदर अतिक्रमण काढणेची कार्यवाही स्थगित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही,

---

### राज्यात सरळ सेवा भरती व स्पर्धा परीक्षा न झाल्यामुळे केंद्र प्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(२) ३४९९५ (१७-०१-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१५ मध्ये अधिसूचना काढून सेवा प्रवेश नियम बदलले असून विस्तार अधिका-यांची ५० टक्के पदे कार्यरत शिक्षकांमधून, सरळसेवा भरतीने २५ टक्के,स्पर्धा परिक्षा द्वारे आणि २५ टक्के पदोन्नतीने भरायची असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र प्रमुखाची ४० टक्के पदे शिक्षकांमधून पदोन्नतीने, ३० टक्के पदे स्पर्धा परिक्षाद्वारे व ३० टक्के कार्यरत शिक्षकांमधून सरळसेवा भरतीने भरावयाची आहेत सन २०१५ पासून सरळ सेवा भरती व स्पर्धा परिक्षाद्वारे भरतीच झालेली नसल्याने केंद्र प्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांची पदे रिक्त असल्याने कामावर विपरीत परिणाम होत आहे हे लक्षात घेता याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०३-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामविकास विभागाने दि.१०/६/२०१४ रोजी अधिसूचना प्रसिध्द् केली असून त्यानुसार विस्तार अधिकारी (शिक्षण) यांची ५० टक्के पदे नामनिर्देशनाने/सरळसेवेने, २५ टक्के पदे मर्यादित विभागीय स्पर्धा परिक्षांमार्फत निवडीने आणि २५ टक्के पदोन्नतीने भरली जातात.
(२) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दि.१/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये केंद्रप्रमुखाची ५० टक्के पदे पदोन्नतीने व ५० टक्के पदे मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेव्दारे भरण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार केंद्रप्रमुख पदाच्या सेवाप्रवेशासंदर्भात महाराष्ट्र जिल्हापरिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, 1967 मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर सुधारीत सेवा प्रवेश नियम अधिसूचित होईपर्यंत केंद्रप्रमुख पदोन्नतीसंदर्भात शालेय शिक्षण विभागाच्या दि.१/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील सुधारीत तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना ग्रामविकास विभागाच्या दि.२७/१२/२०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोली क्रीडा अधिकारी यांनी पदाचा गैरवापर करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(३) ३६४९६ (१०-०१-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली क्रीडा अधिकारी यांनी क्रीडा विभागांतर्गत क्रीडांगण, व्यायामशाळा व विधि कामामध्ये पदाचा गैरवापर करुन स्वतः गुत्तेदारी करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अधिकाऱ्यांची गेल्या ११ वर्षापासून एकाच पदावर कार्यरत असून त्यांनी व संबंधित अधिकारी यांनी सन २०१९-२०२० या कालावधीत मर्जीतील पाचही तालुक्यातील ग्रामपंचायतींना व्यायामशाळा व क्रीडांगण १५ गावांना मंजूर करुन ५० टक्के निधी स्वतः व निधी संबंधित ग्रामसेवक यांनी कामे न करता परस्पर घेतल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्ताव नसतानाही व्यायामशाळा व क्रीडांगणाचे धनादेश काढण्यात आले असून मंजूर झालेल्या व्यायामशाळांकरिता लागणारे साहित्य खरेदी करताना मर्जीतील ठेकेदारांना निविदा देऊन निकृष्ट दर्जाचे सामान खरेदी करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आजतागायत एकही राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय खेळांडूसाठी प्रशिक्षण देण्यात आले नसून प्रशिक्षणाच्या नावाखाली निधी घेण्यात आल्याचेही निदर्शनास आले तसेच गैरव्यवहार करणाऱ्यांविरुध्द गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया करणा-या अधिकाऱ्यांची बदली करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर अधिकारी हे लाचखोरी व गैरव्यवहारामुळे क्रीडा विभागाच्या अनुदानाच्या योजनांवर कागदावरच दाखविल्याने शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, संबंधित अधिकारी यांची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा

करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०४-०३-२०२४) :** (१) हिंगोली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात आर्थिक अनियमितता केल्याची बाब निदर्शनास आली आहे

(२), (३), (४), (५) व (६) अंश:त खरे असून सदर कार्यालयामध्ये क्रीडा विभागाच्या योजनामध्ये आर्थिक अनियमितता निदर्शनास आली आहे. त्याअनुषंगाने संबंधिताविरुध्द विभागीय चौकशी आदेशित केलेली आहे.

---

## राज्यात जिल्हा परिषद शाळेतील पीएचडी, नेट, सेट झालेल्या प्राथमिक शिक्षकांना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पदामध्ये सामावून घेण्याबाबत

**(४) ४०२२० (०९-०४-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषद शाळेतील पीएचडी, नेट, सेट झालेल्या प्राथमिक शिक्षकांना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पदामध्ये सामावून घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला असल्याची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांकडून याद्या मागविण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व प्राध्यापक यांचा समावेश करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-०२-२०२४) :** (१) शालेय शिक्षण विभागाने रिक्त पदांची माहिती ग्रामविकास विभागाकडे मागितली होती. त्यासंदर्भात विभागाकडे निवेदन प्राप्त झाले होते. त्या निवेदनावर सर्व विभागीय आयुक्त यांचेकडून माहिती मागविण्यात आली होती. ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) महाराष्ट्र शिक्षण सेवेतील गट-अ व ब पदांच्या सेवाप्रवेश नियमाबाबतची कार्यवाही शालेय शिक्षण व क्रिडा विभागामार्फत तर, जिल्हा परिषदेतील गट-क मधील पदांच्या सेवाप्रवेश नियमाबाबतची कार्यवाही ग्रामविकास विभागामार्फत करण्यात येते. राज्य शासनाच्या किंवा जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील मंजूर पदांसाठी अनुक्रमे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ व महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम-१९६० च्या कलम-२७४ खाली तयार केलेल्या महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम-१९६७ खाली अधिसूचित केलेल्या त्या त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार नियुक्ती केल्या जातात. सध्या उच्च अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांना, मागणी केलेल्या पदांवर सामावून घेण्याची तरतूद नसल्यामुळे सदर मागणीप्रमाणे पुढील कार्यवाही करणे शक्य नाही.

---

## वाटुळ (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) हे गाव हरितपट्ट्यांमधून वगळण्याबाबत

**(५) ४०५६२ (०९-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाटुळ (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) हे गाव हरितपट्टा म्हणून घोषित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाव हरितपट्टा म्हणून घोषित केल्यामुळे तेथील गौण खनिज व इतर अन्य नैसर्गिक साधन सामुग्री विपुल प्रमाणात असूनही त्याचा उपभोग स्थानिक ग्रामस्थांना घेता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाटुळ हे गाव हरितपट्ट्यामधून वगळून येथे शासकीय नियमावली शिथिल करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २७ फेब्रुवारी,२०२१ रोजी वा त्यासुमारास मा.पर्यटन मंत्री महोदयांकडे पत्राद्वारे मागणी केली

आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१८-०४-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३),(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भोर (जि.पुणे) या तालुक्यातील राजगड किल्ला तसेच रोहिडा व रायरेश्वर किल्ल्याच्या पायथ्याशी पर्यटकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) ४१५६९ (०९-०४-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील राजगड किल्ल्यावर पर्यटकांसाठी सोयी सुविधा तसेच रोहिडा व रायरेश्वर किल्ल्याच्या पायथ्याशी पर्यटकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पर्यटन, मा.पर्यावरण व मा.राजशिष्टाचार मंत्री यांना दिनांक १६ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१८-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) किल्ले रोहिडा व किल्ले रायरेश्वर यांना दि.३०/०३/२०१७,२८/०३/२०२२ व १४/१२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
तसेच, किल्ले राजगड व तोरणा यांच्या बाबत पर्यटन संचालनालय यांच्याकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यावर निधी वितरीत केला जाईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हा परिषद शाळांमध्ये सफाई कर्मचा-यांच्या नियुक्त्या करण्याबाबत

**(७) ४३८५२ (०४-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या शाळांमध्ये सफाई कर्मचारी नसल्याने वर्गांची व शाळेच्या परिसराची सफाई होत नसल्यामुळे विदयार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे डिसेंबर,२०२१ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०३-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही. जिल्हा परिषद आस्थापनेवर सफाई कर्मचारी पद मंजूर नाही, परंतू शाळास्तरावर प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या सहाय्याने भोजन व्यवस्थेस लागणारा परिसर स्वच्छ करण्यात येतो. चंद्रपूर जिल्हा परिषदेंतर्गत शाळेत सफाई होत नसल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याची बाब किंवा तक्रार आल्याची बाब प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिक्षकांच्या नोंदी सेवापुस्तकातील जातवैधतेच्या नोंदी तपासून दुरुस्त करण्याबाबत**

**(८) ४७१३७ (०९-१०-२०२२). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षक संवर्गाच्या शासनमान्य १०० बिंदुनामावलीमध्ये मागासवर्गात नोंदविलेल्या शिक्षकांची पुढील बिंदूनामावली अदयावत करताना सध्या स्वयंघोषणा पत्राच्या/खुलासा पत्राच्या आधारे निवड प्रवर्ग बदलता येतो काय,

(२) असल्यास, लातूर जिल्हा परिषदेने सध्या स्वयंघोषणा पत्राच्या/खुलासा पत्राच्या आधारे १३० शिक्षकांचा निवड प्रवर्ग बदलण्यात आला आहे काय तसेच किती शिक्षकांचा प्रवर्ग बदलण्यात आला आहे,

(३) असल्यास, उक्त एम नागराज विरूध्द पंजाब सरकार या खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व १८ ऑक्टोबर १९९७ च्या राज्य शासन निर्णयानुसार या सर्व शिक्षकांच्या नोंदी त्यांच्या मागासवर्गात त्यांच्या सेवापुस्तकातील जातवैधतेच्या नोंदी तपासून दुरूस्त करून घेण्यात येणार आहेत काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने सेवापुस्तकातील जातवैधतेच्या नोंदी तपासून दुरूस्त करून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१२-०१-२०२४) :** (१) नाही.

(२), (३) व (४) जिल्हा परिषद, लातूर अंतर्गत प्राथमिक शिक्षकांच्या बिंदुनामावलीसंदर्भात तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुसार सदर बिंदुनामावलीची चौकशी करण्याकरीता ग्रामविकास विभागाच्या दि.२९/११/२०१७ अन्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली.

सदर समितीने दाखल केलेल्या अहवालानुसार १३० शिक्षकांचे सन-२०१७ च्या बिंदुनामावलीतील प्रवर्ग बदलण्यात आले होते. तथापि, सदर १३० शिक्षकांपैकी ०४ शिक्षकांची निवड ही खुला प्रवर्गातून झाली असल्याचा पूरावा कार्यालयाकडे उपलब्ध आहे. तर उर्वरित १२६ शिक्षकांबाबत सर्व अभिलेख्यांची फेरतपासणी करुन त्याप्रमाणे नोंदी दुरुस्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्राथमिक पदवीधर, कें.प्रा.शा. आसरडोह (ता. धारूर जि. बीड) येथे सेवाज्येष्ठ शिकाक्षाची शिक्षण विस्तार अधिकारी अथवा केंद्र प्रमुख पदी पदोन्नतीने नियुक्ती करणेबाबत**

**(९) ५१३२५ (२०-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.मच्छिंद्रनाथ पंडीतराव सोळंके, प्राथमिक पदवीधर, कें.प्रा.शा. आसरडोह (ता. धारूर जि. बीड) यांना शिक्षण विस्तार अधिकारी अथवा केंद्र प्रमुख पदी पदोन्नती मिळणेबाबत दिनांक १३ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.मच्छिंद्रनाथ सोळंके यांच्या पेक्षा सेवा ज्येष्ठतेत कनिष्ठ असणाऱ्या व्यंकटी केरबा गडदे, व गंगाधर विश्वनाथ शिंदे यांना केंद्र प्रमुख पदी पदोन्नती दिली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०५-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे, श्री.गडदे व श्री.शिंदे यांनी अभावितपणे केंद्रप्रमुखपदी काम केल्यामुळे शासन निर्णय दि.१६.०२.२०१८ नुसार अप्पर विभागीय आयुक्त, औरंगाबाद व मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील

प्राप्त आदेशानुसार केंद्रप्रमुख पदी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीने पदस्थापना देण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिरसम (ता.पालम, जि.परभणी) या संत जनाबाई ग्रामीण विकास महिला मंडळ, संस्थेस क्रीडा सुविधा निर्मितीसाठी निधी मंजूर करणेबाबत

**(१०) ५२९७० (१८-०१-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरसम (ता.पालम, जि.परभणी) या संत जनाबाई ग्रामीण विकास महिला मंडळ, संस्थेस क्रिडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य योजना सन २०१६-२०१७ अंतर्गत बंदिस्त प्रेक्षागृह बांधण्यासाठी ९० लाख रुपये एवढा निधी मंजूर केला आहे, तसेच सदरहू कामे निधीअभावी सन २०१७-१८ पासून अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निधी मंजूर करण्यात यावा व कामे पुन्हा सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उपमुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १८ सप्टेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्नुषंगाने निधी मंजूर करुन काम सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (३१-०५-२०२४) :** (१), (२), व (३) संत जनाबाई ग्रामीण विकास महिला मंडळ, सिरसम ता. पालम, जि.परभणी या संस्थेस क्रीडा सुविधा योजनेअंतर्गत बंदिस्त प्रेक्षागृहासाठी रुपये ९०.०० लक्ष निधी मंजूर करण्यात आलेला असून प्रथम अनुदान हप्ता व द्वितीय अनुदान हप्ता रुपये असे एकुण ५८.५० लक्ष अनुदान वितरित करण्यात आले आहे. अंतिम हप्ता / तृतीय हप्ता रुपये ११.५० लक्ष मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्धता व अन्य आवश्यक अटी शर्ती तपासून अंतिम हप्ता प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील दलितवस्ती सुधार योजना पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून झालेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(११) ५४३०१ (२५-०१-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील दलित वस्ती सुधार योजना पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून झालेले कामे निकृष्ट दर्जाचे असल्याने कामाची चौकशी करावी, अशी मागणी स्थानिक संघटनेने केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, रावेर तालुक्यातील खेडे बुद्रुक पुरी आहेरवाडी येथे ई-निविदा काढताना त्यामध्ये गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२९-०२-२०२४) :** (१) होय,
(२) नाही.
(३) चौकशी अंती अनियमितता आढळून आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय (डॉ.शामाप्रसाद मुखर्जी) रूर्बन योजनेअंतर्गत १६ गावांचा सामुहिक विकास करण्याबाबत**

**(१२) ५६४६४ (१९-०१-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (ता.परतुर, जि.जालना) येथे राष्ट्रीय (डॉ. शामाप्रसाद मुखर्जी) रूर्बन योजनेअंतर्गत १६ गावांचा सामुहिक विकास करण्यासाठी केंद्र शासनाने सुरु केलेली योजना पूर्णत्वास नेण्यासाठी राज्य शासन उदासीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय (डॉ.शामाप्रसाद मुखर्जी) रूर्बन योजनेअंतर्गत उपरोक्त १६ गावांचा सामुहिक विकास करण्यासाठी राज्य शासनाकडून कधी व किती निधी वितरीत करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) आष्टी गावसमुहाकरीता दि .३१ मार्च, २०२२ रोजी अपूर्ण (Ongoing) असलेल्या २९ कामांकरिता रु. १८ कोटी दायीत्व असल्याचे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जालना कार्यालयाकडून दि .१० मे, २०२२ रोजी ईमेल द्वारे प्रस्तावित करण्यात आले आहे. तथापि, केंद्र शासनाने,आष्टी गावसमुहाकरीता रुरबन सॉफ्ट प्रणीलवर दि . ३१ मार्च, २०२२ रोजी अपूर्ण (Ongoing) असलेल्या एकूण ८२ कामांकरीता ३,११,४१,१५७ /- दायित्व रक्कम / निधीस मंजूरी दिली आहे. सदर यादीमध्ये जिल्ह्याने मागणी केलेल्या २९ कामांपैकी १३ कामांचा समावेश असून रक्कम रुपये २,५८,२६,९८२ /- दायीत्व रक्कम उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर उपलब्ध करुन दिलेल्या दायीत्व रकमेपैकी जिल्ह्याच्या मागणीनूसार रक्कम रु. ९२,०१,६५८ /- एवढा निधी गाव समुहाकरीता OD Limit द्वारा वितरित करण्यात आला आहे. मंजूर दायीत्वानुसार केंद्र व राज्य हिस्स्यासह अंतिम निधी राज्य शासनाकडून वितरीत करण्यात आला असुन, सदर निधी राज्य स्तरावरील SNA खात्यावर दिनांक ०६ मार्च, २०२३ रोजी जमा झालेला आहे .

---

**आष्टी (ता.परतुर, जि.जालना) येथील मिनी एमआयडीसीचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(१३) ५६४६५ (२४-०१-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (ता.परतुर, जि.जालना) येथे शेतकऱ्यांच्या शेतमालावर प्रक्रिया करण्यासाठी २० एकर जमिनीवर मिनी एमआयडीसी प्रकल्प मंजूर प्रकल्पाचे काम शासनाकडून मिळणाऱ्या निधी अभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी निधी उपलब्ध करुन शेतमालावर विविध प्रक्रिया करून शेतकऱ्याचे उत्पन्न वाढवणे, त्यांच्या मार्फतच त्याची वितरण व्यवस्था लावणे, शेतकरी महिला बचत गटांना प्राधान्य देणे यासाठी शासानाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१४-०३-२०२४) :** (१) मौजे आष्टी ता.परतुर,जि.जालना या ठिकाणी सद्यस्थितीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत कोणत्याही प्रकारचे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याचे प्रस्तावित नाही. त्यामुळे निधी अभावी काम प्रलंबित आहे, हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निफाड (जि.नाशिक) तालुक्यात प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर कामांना दिलेली स्थगिती उठविणेबाबत**

**(१४) ५६६७० (२४-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यात प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत १) शासन निर्णय क्र.टीडीएस२०२२/०३/प्र.क्र.२०६ दिनांक २९/०३/२०२२, २) शासन निर्णय क्र.टीडीएस२०२२/०३/प्र.क्र.२०६ दिनांक ३१/०३/२०२२ व ३) शासन निर्णय क्र.टीडीएस२०२२/०६/प्र.क्र.३९२, दि.२८/०६/२०२२ अन्वये विकास कामे मंजूर केलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या विकास कामांना शासनाने दिनांक १९ जुलै,२०२२ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे, हे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामे ही त्या त्या पर्यटन स्थळांच्या संबंधीत विकासाची कामे असून या कामावरील स्थगिती उठविणे कामी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशत: खरे आहे. पर्यटन विभाग शासन पत्र दि. २५/०७/२०२२ अन्वये दि.०१ एप्रिल,२०२१ पासून मंजूर केलेल्या कामांना स्थगिती देण्यात आली आहे.

(३) पर्यटन विभाग शासन परिपत्रक दि. १२ जानेवारी, २०२४ अन्वये प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत दि.०१/०४/२०२१ पासून मंजूरी देण्यात आलेल्या सर्व कामांवरील स्थगिती सरसकटपणे उठविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक उद्योगात अद्यापही कामगारांना किमान वेतन मिळत नसल्याबाबत**

**(१५) ५८३४७ (२७-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक उद्योगात अद्यापही कामगारांना किमान वेतन मिळत नसल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने किमान वेतन न मिळण्यामागची कारणे काय, तसेच संबंधीत उद्योगांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०१-१२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) चंद्रपूर जिल्हयातील ०२ उद्योगांमध्ये किमान वेतन मिळत नसल्याबात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने सहायक कामगार आयुक्त, चंद्रपूर यांच्या कार्यालयात संबंधित कंपनी, मालक आणि कामगार संघटना यांच्यात (वैयक्तिक व्यवस्थापन सल्लागार योजना) अंतर्गत प्रकरणे चालविण्यात आली असून त्यान्वये कंपनी व्यवस्थापनास

दिलेल्या निर्देशानुसार कामगारांना किमान वेतन अदा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी शासन वेगवेगळया जिल्ह्यात रेंट अ मोटर सायकल योजना सुरू करण्याबाबत**

**(१६) ५८६३७ (०३-०५-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी शासन वेगवेगळया जिल्ह्यात रेंट अ मोटर सायकल योजना १९९७ सुरू करण्याबाबत प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त योजना त्वरीत सुरू करण्याबाबत शासनाने कोणल्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१८-०४-२०२४) :** (१) नाही हे खरे नाही,
पर्यटन संचालनालयामार्फत रेट अ मोटार सायकल योजना १९९७ सुरु करण्याबाबत कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीक्षेत्र नांगरतास (ता.जि.जालना) येथील तीर्थक्षेत्राच्या विकास कामांबाबत**

**(१७) ६३२७४ (०३-०५-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीक्षेत्र नांगरतास (ता. जि.जालना) येथे वर्षभर पर्यटक व भाविकांची वर्दळ असणारे तीर्थक्षेत्र असून श्रावण महिन्यात दिवसाला २५ ते ३० हजार भाविक दर्शनासाठी येतात सदर तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी २ कोटी रुपये निधीच्या मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ठिकाणी सभागृह उभारण्यात आले असून भाविकांसाठी शेड उभारणी, शौचालय बांधकाम, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पेव्हर ब्लॉक इत्यादी कामे तात्काळ करणे आवश्यक आहे. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरील कामांसह परिसर विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१८-०४-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर कामांसाठी शासन निर्णय दि.३१/०३/२०१८, दि.३१/११/२०२१ व दि.२०/०२/२०२४ अन्वये एकूण रु.२६०.७१ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर निधीच्या उपयोगिता प्रमाणपत्रासह प्रस्ताव प्राप्त झाल्यास निधी उपलब्धतेनुसार उर्वरित निधी वितरीत केला जाईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे-परजापूर (ता.अंधेरी) येथील तलावाच्या सुशोभिकरणाच्या कामांकरिता निधी मंजूर करणेबाबत**

**(१८) ६३३३४ (०३-०५-२०२३). श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे-परजापूर, आरे कॉलनी (ता.अंधेरी) येथील न.भू मा.क्र. १२ येथे नैसर्गिक तलावाच्या सुशोभिकरणाकरिता पर्यटन विभागाने २ कोटी ६७.७५ लाख इतका निधी मंजूर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मंजूर निधीपैकी दिनांक २२ऑगस्ट,२०१४ च्या शासन निर्णयान्वये रुपये ३३.८७ लक्ष व दिनांक २१ मार्च,२०१६ च्या शासन निर्णयान्वये रुपये ६७.७५ लक्ष् असे एकूण रुपये १०१.६२ लक्ष निधी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांना वितरित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राप्त निधीतून आतापर्यत कोणकोणती कामे करण्यात आली वा येत आहेत,

(४) असल्यास, उर्वरित निधी तातडीने मिळण्याबाबत कै.आमदार रमेश लटके यांनी दिनांक ३ डिसेंबर, २०१८ रोजी त्यानंतर अनेक वेळा पर्यटन मंत्री यांच्याकडे पत्रव्ययवहार व मागणी करुनही अदयाप निधी उपलब्ध झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच उर्वरित किती निधी देणे बाकी आहे व उर्वरित निधी कधीपर्यत प्राप्त होणार याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१८-०४-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मौजे परजापुर, आरे कॉलनी (ता.अंधेरी) न. भु.क्र.९२ आरे कॉलनी येथील नैसर्गिक तलावाचे संवर्धन व सुशोभिकरण करण्यासंदर्भात प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली सर्व ०९ कामे पुर्ण झाली आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) सदर कामांना शासन निर्णय दि.२२/०८/२०१४, दि.२१/०३/२०१६, दि.२२/०३/२०२१ व दि.०५/०१/२०२२ अन्वये रु.२६६.६२ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर कामे पुर्ण झाली असल्याने या कामांना अधिक निधी वितरणाची आवश्यक्ता नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतील विकास कामांची स्थगिती रद्द करून निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(१९) ६४६९९ (२३-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतील विकास कामांची स्थगिती रद्द करून निधी उपलब्ध करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० एप्रिल, २०२३, दिनांक ३ मार्च, २०२३ , दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त कामांची स्थगिती रद्द करून निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) निवेदनामध्ये नमूद करण्यात आलेल्या कामावरील स्थगिती पर्यटन विभाग शासन निर्णय दि.०८/०९/२०२३ व दि.११/०९/२०२३ अन्वये उठवून जिल्हाधिकारी, नाशिक यांना निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील औद्योगिक वसाहतीतील कामगारांना कामगार कायदयानुसार लाभ मिळत नसल्याबाबत**

**(२०) ६५९४५ (२३-०८-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर व जिल्हयातील आद्यौगिक वसाहतीतील स्थलांतरीत कामगारांना किमान वेतन व अन्य शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त कामगारांना किमान वेतन व शासकीय योजनांचा लाभ देणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०४-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

पुणे शहर व जिल्हयातील औद्योगिक वसाहतीतील स्थलांतरीत कामगारांच्या किमान वेतनाबाबत एकही तक्रार कामगार उपायुक्त, पुणे यांच्या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. तसेच स्थलांतरीत कामगारांसाठी मदत कक्ष स्थापन केलेला असून त्यामार्फत देखील एकही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यात बनावट दिव्यांग प्रमाणपत्रचा आधार घेऊन सोयीच्या ठिकाणी बदली घेणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करणेबाबत**

**(२१) ६७२२८ (२३-०८-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेमध्ये सोयीच्या ठिकाणी बदली किंवा आहे त्या ठिकाणी कायम राहण्यासाठी शिक्षकांनी बनावट दिव्यांग प्रमाणपत्राचा आधार घेतला असल्याची धक्कादायक माहिती नुकतीच निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील अनेक शिक्षकांनी बदलीसाठी दिव्यांगत्वाचे प्रमाण कमी असतानाही ४०% पेक्षा अधिक दिव्यांग असल्याचे बोगस प्रमाणपत्र सादर करून सोयीच्या ठिकाणी बदली केल्याचे उघडकीस आले आहे, खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्ह्यातील शिक्षकांच्या बदल्यामध्ये दिव्यांग प्रमाणपत्र सादर केलेल्या शिक्षकांच्या प्रमाणपत्राची चौकशी करण्याबाबत शासनाने समिती नेमली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून सोयीच्या ठिकाणी बदली घेतलेल्या शिक्षकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारसूळ (ता.निफाड जि.नाशिक ) येथील जिल्हा परिषद शाळेतील दोन शिक्षकांची पेसाअंतर्गत बदली झाली असल्याबाबत**

**(२२) ६७५०१ (२३-०८-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारसूळ (ता.निफाड जि.नाशिक) येथील जिल्हा परिषद शाळेतील दोन शिक्षकांची पेसाअंतर्गत बदली झाली असल्याने त्याजागी नवीन शिक्षकांची नेमणूक होत नाही तोपर्यंत शाळा बंदच ठेवण्याचा निर्णय शालेय व्यवस्थापन समितीने दिनांक १० जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शाळा व्यवस्थापनाने जिल्हापरिषद, शिक्षणाधिकारी, निफाड गटविकास अधिकारी व गट शिक्षणाधिकाऱ्यांना लेखी निवेदनही दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नविन शिक्षकांची नेमणूक करुन शाळा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-०२-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) दि.१४ व १५ जून २०२३ रोजी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, निफाड यांनी जि.प. प्राथमिक शाळा, कारसुळ ता.निफाड येथे भेट देऊन चौकशी केली असता बदली झालेल्या दोन शिक्षकांपैकी एक शिक्षक दि.२५.०५.२०२३ रोजी कार्यमुक्त झालेले आहे. तथापि एका शिक्षकास न्यायालयीन बदलीप्रकरणामुळे कार्यमुक्त केलेले नाही. दि.१६.०६.२०२३ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.नाशिक यांनी सदर शाळेस भेट देऊन ग्रामस्थ, शालेय व्यवस्थापन समितीचे समुपदेशन केले व दि.१६.०६.२०२३ रोजी पासून शाळा नियमितपणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील एमआयडीसी मध्ये उदयोग उभारण्याबाबत**

**(२३) ६८०७८ (२८-०८-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील दर्यापूर अंजनगाव सुर्जी , नांदगाव खांडेश्वर, धामणगाव रेल्वे चांदूर रेल्वे , भातकुली येथील एमआयडीसीतील भुखंडाचे वाटप झाले असतानाही येथे उदयोग निर्मिती झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत उदयोग निर्मिती होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१४-०३-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

- दर्यापूर औद्योगिक क्षेत्रात ३५ भुखंडाचे आरेखन करण्यात आले आहे. त्यापैकी २८ भुखंडाचे वाटप करण्यात आले असून,०६ भुखंडावर उत्पादन सुरु आहे. ०७ भुखंड वाटपास उपलब्ध आहेत.
- अंजनगाव सुर्जी औद्योगिक क्षेत्रात २८ भुखंडाचे आरेखन करण्यात आले आहे. त्यापैकी २६ भुखंडाचे वाटप करण्यात आले असून,१० भुखंडावर उत्पादन सुरु आहे. ०२ भुखंड वाटपास उपलब्ध आहेत.
- धामनगाव (रेल्वे) औद्योगिक क्षेत्रामध्ये ३९ भुखंडाचे आरेखन करण्यात आले आहे. त्यापैकी ३५ भुखंडाचे वाटप करण्यात आले असून, ०९ भुखंडावर उत्पादन सुरु आहे. ०४ भुखंड वाटपास उपलब्ध आहेत.
- चांदुर (रेल्वे) औद्योगिक क्षेत्रामध्ये ४३ भुखंडाचे आरेखन करण्यात आले आहे. त्यापैकी ३९ भुखंडाचे वाटप करण्यात आले असून, १३ भुखंडावर उत्पादन सुरु आहे. ०४ भुखंड वाटपास उपलब्ध आहेत.

- भातकुली औद्योगिक क्षेत्रामध्ये ४३ भुखंडाचे आरेखन करण्यात आले आहे. ३९ भुखंडाचे वाटप करण्यात आले असून, १३ भुखंडावर उत्पादन सुरु आहे. ०४ भुखंड वाटपास उपलब्ध आहेत.
- नांदगाव खांडेश्वर औद्योगिक क्षेत्रामध्ये ३८ भुखंडाचे आरेखन करण्यात आले असून, ३८ भूखंड वाटपास उपलब्ध आहेत.
- राज्यात विविध उद्योग आकर्षित करण्यासाठी शासनाने औद्योगिक धोरणासह इतर सेक्टर स्पेसिफीक (क्षेत्र निहाय) धोरणे उदा.माहिती तंत्रज्ञान धोरण,निर्यात धोरण,इलेक्रॅाटनिक धोरण,वस्त्रोद्योग धोरण इत्यादी धोरणे जाहीर केली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण विभागातील सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक कर्मचाऱ्यांच्या बदल्या रद्द करण्याबाबत

**(२४) ६८३८९ (२३-०८-२०२३). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण विभागातील सेवानिवृत्ती होणाऱ्या सुमारे ४५ शिक्षकांच्या बदल्यांच्या नावाखाली त्यांच्या मुळ तालुक्यापासून सुमारे ७० ते ८० किमी दूर अतिदुर्गम भागात बदली करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बदल्या रद्द करुन मिळणेबाबत शिक्षकांनी तसेच शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्‌अनुषंगाने सदर शिक्षक सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या दूरवर झालेल्या बदल्या रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०३-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामविकास विभागाच्या दि.०७/०४/२०२१ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद पालघर अंतर्गत शिक्षक संवर्गाच्या संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने जिल्हा अंतर्गत बदली प्रक्रियेमध्ये अवघड क्षेत्रातील रिक्त जागा प्राधान्याने भरण्याबाबत राबविण्यात आलेल्या टप्यामध्ये प्राथमिक शिक्षकांचे सरासरी वयोमान ४६ ते ५४ या वयोगटातील एकूण ४५ प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत बदल्या झालेल्या आहेत.

संबंधित प्राथमिक शिक्षक हे जिल्हा अंतर्गत बदलीपूर्वी मुख्यतः वसई व पालघर तालुक्यामध्ये कार्यरत होते. जिल्हा अंतर्गत बदलीनंतर संबंधित शिक्षकांची बदली मुख्यतः मोखाडा, जव्हार, विक्रमगड तालुक्यामध्ये झालेली आहे

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर बदली प्रक्रियेमधील २ प्राथमिक शिक्षकांना शासन निर्णय दि.०७/०४/२०२१ मधील मुद्दा क्र.५.१०.१ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दि. २२/०६/२०२३ च्या आदेशानुसार मुळ शाळेवर पदस्थापना देण्यात आलेली आहे.

ग्रामविकास विभागाच्या दि.५/७/२०२३ च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार पालघर जिल्ह्यामध्ये सदर टप्प्यातील ४३ प्राथमिक शिक्षकांचे समुपदेशनाने समायोजन/ समानीकरण प्रक्रिया दि.५/९/२०२३ व दि.४/१०/२०२३ रोजी राबविण्यात आली होती. त्यापैकी एकूण ३५ शिक्षकांना पदस्थापना देण्यात आली आहे. तसेच १ शिक्षिका स्वेच्छेने सेवानिवृत्त झाल्या असून उर्वरित ७ शिक्षकांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल असल्याने शाळा घेण्यास नकार दिला असून, सदर प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

---

## कर्जत ते हस्तपोखरी (जि.जालना) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेबाबत

**(२५) ६८५६७ (३१-०८-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत ते हस्तपोखरी (जि.जालना) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करुन निधीचा अपहार केल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम हे अंदाज पत्रकानुसार करण्यात आले नसून या रस्त्यासाठी वापरण्यात आलेले ट्रिटेड बेस जर्मन तंत्रज्ञान हे निष्फळ ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विभागाकडून केलेल्या पाहणी नंतर प्रत्यक्ष कामात अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित मक्तेदार एजन्सीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२२-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ अंतर्गत संशोधन व विकास ( R & D) या सदराखाली सदर काम मंजूर असून अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार काम झालेले आहे. या कामात डांबरीकरणाचे खाली SAMI Layer (Geosynthesis fabric) चा वापर करण्यात आला आहे. सदरील काम नविन तंत्रज्ञान (R & D) अंतर्गत करण्यात येत आहे. सद्यस्थितीत काम प्रगतीत आहे.

(३) अंशत: खरे आहे.

सदर कामाची तपासणी NRIDA, नवी दिल्ली यांच्याकडून तपासणी पथक स्थापन करून केली आहे. NRIDA, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सूचनांनुसार राज्य गुणवत्ता समन्वयक, प्रमंग्रासयो, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, पुणे यांचेमार्फत दिनांक १६.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये समिती स्थापन करून चौकशी करण्यात आली आहे. सदर समितीने सदर कामाची FWD Test (Falling Weight Deflectometer) घेण्याबाबत सुचविले होते. त्यानुसार सदर चाचणी दिनांक १६.१०.२०२३ रोजी घेण्यात आली आहे. सदर चाचणीचा प्राप्त अहवाल IIT, Powai, मुंबई यांना पाठवून त्यांचे तांत्रिक मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. तसेच सदर कामावर IIT, Powai या संस्थेतील तंज्ञानी दिनांक ०८.०१.२०२४ रोजी दौरा केला असून सदर अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी तपासणी पथकाने NRIDA, नवी दिल्ली यांना सादर केलेल्या अहवालास अनुसरून NRIDA, नवी दिल्ली यांनी केलेल्या सूचनेनुसार कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, जालना यांना कार्यमुक्त केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे करंजुल (सु) पैकी वडमाळ (ता. सुरगाणा, जि. नाशिक) येथील जलजीवन मिशन अंतर्गत निकृष्ट दर्जाची कामे होत असल्याबाबत

**(२६) ६८९७४ (२३-०८-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे करंजुल (सु) पैकी वडमाळ (ता. सुरगाणा, जि. नाशिक) येथील जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेली कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काम निकृष्ट झाली असल्याने तसेच आदिवासी बांधवांची फसवणूकी होत असल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांना दिनांक ११ मे,२०२३ रोजी लेखी निवेदनानुसार सर्व पुराव्यानिशी चौकशी करुन संबंधित दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली

आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर कामांच्या दर्जाबाबत खुद्द केंद्रीय राज्यमंत्री, पालकमंत्री, माजी पालकमंत्री यांच्यासह सर्वच लोकप्रतिनीधींकडून लेखी तक्रारी करण्यात आलेल्या आहेत, हे ही देखिल खरे आहे काय

(४) असल्यास, सुरगाणा व कळवण, देवळा, चांदवड, दिंडोरी तालुक्यात जुन्याच विहीरींचे अंदाजपत्रक तयार करुन नवीन काम दाखवून बीले लाटण्याचा प्रकार होत आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, कमी दर्जाचे पाइप, सिमेंट, एमआरजीएस मध्ये ४ लक्ष किंमतीत होणारी विहीर जलजीवन मध्ये ९ लक्ष रुपये दाखवून निधी लाटण्याचा प्रकार होत असल्याने शासनाच्या निधीचा अपव्यय होत आहे हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, जलजीवन मिशनच्या कामांना जिल्हा परिषदेत ग्रामिण पाणीपुरवठा विभागास स्वतंत्र कार्यकारी अभियंता नसून बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता यांचेकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय

(७) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२६-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

(६) हे खरे आहे.

(७) व (८) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील रामसेतू पूल ते एमआयडीसी परिसरातील पथदिवे बंद असल्याबाबत**

**(२७) ६९१५३ (३१-०८-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)चंद्रपूर जिल्ह्यातील रामसेतू पूल ते एमआयडीसी परिसर या २ कि.मी रस्त्यावर विद्युत खांबाला एकही लाईट नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित रस्त्यावर काही अनुचित प्रकार घडल्यास याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०६-११-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

चंद्रपूर जिल्हयातील रामसेतू पूल ते एमआयडीसी परिसरात पथदिवे नसल्याबाबत लोकप्रतिनिधींकडून निवेदने प्राप्त झाली होती. सदर रस्ता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्राबाहेरील दाताळा ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये आहे.

तथापि, चंद्रपूर औद्योगिक संघटनेची विनंती, उद्योजकांची मागणी, कामगारांची सोय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांची विनंती विचारात घेऊन रामसेतू पूल ते एमआयडीसी परिसर दरम्यान १९९२ साली मऔवि महामंडळामार्फत ९३ पथदिवे बसविण्यात आले होते. सदर पथदिव्यांच्या उभारणीनंतर त्यांची वार्षिक देखभाल व दुरुस्ती ग्रामपंचायतीव्दारे करण्यात येईल व त्याकरीता १०० टक्के खर्च शासन अनुदानातून करण्यात येईल या अटीवर मऔवि महामंडळामार्फत पथदिव्यांचे काम करण्यात आले होते.

(२) रामसेतू पूल ते एमआयडीसी परिसरात पथदिवे नसल्याबाबत लोकप्रतिनिधींकडून सन २००७ व २००८ मध्ये निवेदने प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने दि.१८.०१.२००८ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षतेखालील झालेल्या जिल्हा उद्योग मित्रचे सभेमध्ये सदर पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती म्हाडा WCL व ग्रामपंचायत यांचेमार्फत करण्यात यावी असा निर्णय पारीत करण्यात आला होता. त्यानुसार याबाबतची संपूर्ण जबाबदारी ही WCL व दाताळा ग्रामपंचायत यांची आहे. सद्यस्थितीत सदर परिसरातील पथदिवे बंद आहेत ही बाब खरी आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक कामगार उप आयुक्त कार्यालयातील निरीक्षकामार्फत बालकामगार नसल्याचा अहवाल देण्यासाठी लाच मागितलेबाबत**

**(२८) ७०२४१ (२५-०८-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील एका हॉटेलमध्ये बालकामगार नसल्याचा अहवाल देण्याकरिता हॉटेल चालकाकडून कामगार उप आयुक्त कार्यालयातील महिला निरीक्षकाने लाच मागितल्याची गंभीर बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर कामगार उपायुक्त कार्यालयामार्फत शहरातील आस्थापनांमध्ये शोध घेवून बाल कामगारांना न्याय देणे अपेक्षित असतांना बाल कामगार नाहीत असा अहवाल देण्यासाठी निरीक्षकाकडून सऱ्हास लाच स्वीकारली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरहू संबंधीतावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२८-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणातील महिला (दुकाने निरीक्षक, श्रेणी-२) यांनी लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत त्यांचेविरुद्ध दि.१५.०६.२०२३ रोजी सातपूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १७२/२०२३, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच, त्यांना दि.१६.०६.२०२३ रोजी पासून निलंबित करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी संबंधित महिला लोकसेवक दुकाने निरीक्षक, श्रेणी-२, नाशिक यांच्याविरुद्ध अभियोगपूर्व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने मंजूरी देण्यात आलेली असून त्यांचेविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीरामपूर (जिल्हा अहमदनगर) तालुक्यामध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम निकृष्ट असल्याबाबत**

**(२९) ७१६२७ (२९-०२-२०२४). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यामध्ये जलजीवन मिशन अंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायत हद्दीमध्ये पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी रस्ते खोदल्यामुळे या रस्त्यांची दुरुस्ती करुन घेणे ग्रामपंचायतील शक्य नसल्याने या योजनेच्या

ठेकेदारांनी रस्ते तात्काळ दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२)  असल्यास, मौजे कारेगाव येथील सरपंचाची बनावट स्वाक्षरी घेऊन संबंधित अधिकाऱ्यांनी व ठेकेदारांनी पाणी पुरवठा योजना ग्रामपंचायतीच्या ताब्यात दिली परंतू योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जल जीवन पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी खोदलेले रस्ते पूर्ववत करुन मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, महाराष्ट्र राज्य व अप्पर मुख्य सचिव पाणीपुरवठा विभाग यांना माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

ग्रामस्थांच्या मागणीनुसार संबंधित ठेकेदार यांनी खोदलेले रस्ते पुर्ववत केलेले आहेत.
(२) मौजे-कोरेगाव रेट्रोफिटींगचे काम आहे ते पुर्ण झालेले असून ग्रामपंचायतीस हस्तांतरण केलेले आहे. सरपंच यांनी स्वाक्षरीस नकार दिल्याने उप सरपंच व ग्रामसेवक यांचे स्वाक्षरी घेऊन हस्तांतरण केलेले आहे. सदर योजनेचे काम हे योग्य झालेले असून त्रयस्थ पहाणी यंत्रणेमार्फत तपासणी करुन अहवाल समाधानकारक आहे.
(३) हे खरे आहे.
(४) खोदलेले काम पुर्ववत करण्याबाबत संबंधित ठेकेदारास जिल्हा परिषदेमार्फत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदूर्ग जिल्ह्यात मुणगे ते कोळंब असे नवीन समुद्र पर्यटन स्थळ विकसित करणेबाबत

**(३०) ७२२३७ (२९-०२-२०२४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)  सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सध्या अस्तित्वात असलेली समुद्र पर्यटन स्थळे पर्यटकांची संख्या विचारात घेता अपुरी पडत असल्याने, समुद्र पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणावर चालना देण्यासाठी कुशल, अकुशल व सुशिक्षित सुमारे ५० हजाराहून अधिक स्थानिक बेरोजगारांना तात्काळ विविध माध्यमाद्वारे शाश्वत, उत्तम रोजगार उपलब्ध होण्यासाठी तसेच देश, विदेशी पर्यटकांना सर्वात सुरक्षित व चांगल्या पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करून या स्थळांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील देवगड व मालवण तालुक्याला समुद्र किनारपट्टीने जोडणाऱ्या आडबंदर-आचराबंदर दरम्यानच्या खाडी पूल तसेच आचरा बंदर ते तळाशिलपर्यंत सुमारे १५ कि. मी. लांबीचा समुद्राच्या काठाने नवीन चौपदरी रस्ता आणि तळाशिल ते सर्जेकोट (मिर्याबांदा, ता. मालवण) दरम्यानच्या खाडीवर पुल उभारुन मुणगे ते कोळंब असे नवीन समुद्र पर्यटन स्थळ विनाविलंब निर्माण करण्याबाबतचे सविस्तर निवेदन तत्कालिन पर्यटन मंत्री यांना दिनांक १० एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास श्री कुणकेश्वर सेवा मंडळ (रजि.) मुंबई यांनी सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गावातील ग्रामस्थांनी, सामाजिक संस्थांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मागील सुमारे १० वर्षांहून अधिक कालावधीपासून सदरहू मागणी केली असून संसदीय आयुधांच्या माध्यमातून सभागृहातही सदर बाब उपस्थित केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू श्री कुणकेश्वर सेवा मंडळ (रजि.) मुंबई यांनी मा.पर्यटन मंत्र्यांना सादर केलेल्या निवेदनात प्रामुख्याने कोणकोणते मुद्दे उपस्थित करण्यात आले तसेच निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर मागणीनुषंगाने सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुणगे ते कोळंब असे नवीन समुद्र पर्यटन स्थळ तात्काळ विकसित करुन स्थानिक ग्रामस्थांना तसेच बेरोजगारांना उदरनिर्वाहाचे साधने उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०४-२०२४) :** (१) व (२) बाबत श्री. कुणकेश्वर सेवा मंडळ यांनी मा.मंत्री पर्यटन यांना सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने संचालक, पर्यटन संचालनालय यांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडून संचालक, पर्यटन संचालनालय यांचेमार्फत प्रस्ताव प्राप्त झाल्यावर प्रादेशिक पर्यटन विकास समितीसमोर सादर करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत

**(३१) ७२७६२ (२९-०२-२०२४). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यात १३ क्रीडा संकुले असून या क्रीडा संकुलांची व विविध क्रीडा स्पर्धांची जबाबदारी ही दोन तालुका क्रीडा अधिकारी पार पाडत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्ह्यात तालुका क्रीडा संकुले असूनही खेळाडूंना सरावासाठी क्रीडा संकुले उपलब्ध करण्यात आली नसल्याने विविध क्रीडा स्पर्धांसाठी शाळा वा शाळांच्या पटांगणांचा वापर करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त क्रीडा संकुलातील देखरेखी अभावी क्रीडा साहित्ये चोरीला गेले असून प्रत्येक स्पर्धेसाठी सक्षम अधिकारी म्हणून तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची उपस्थिती गरजेची असतानाही सदर पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त जिल्ह्यातील क्रीडा संकुले सरावासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच सक्षम क्रीडा अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (३०-०५-२०२४) :** (१) हे, अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्हात १४ ठिकाणी तालूका क्रीडा संकूलांची उभारणी करण्यात आली आहे. तालुका क्रीडा अधिकारी रिक्त असलेल्या पदांवर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा अधिकारी व क्रीडा मार्गदर्शक यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविलेला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

तालुकास्तरावर मैदानी स्पर्धा, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, कुस्ती, फुटबॉल, क्रिकेट, कराटे, बुध्दीबळ व बॅडमिंटन या खेळांचा समावेश आहे. परंतु प्रत्येक तालूका क्रीडा संकुलामध्ये या सर्व १० खेळांची सुविधा एकाच वेळी उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे काही खेळांसाठी इतर शाळांची क्रीडांगणे क्रीडा स्पर्धेकरीता वापरण्यात येतात.
(३),(४) व (५) क्रीडा संकुलातील क्रीडा साहित्य चोरीला गेल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नसून क्रीडा अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावरून कार्यवाही सुरू आहे.

---

## सिंधुदुर्ग जिल्हा परिषद अंतर्गत ओझर ते कातवड रस्त्याचे डांबरीकरण व मजबूतीकरणाचे काम करण्याबाबत

**(३२) ७३६९० (०६-०३-२०२४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा परिषद अंतर्गत ओझर ते कातवड रस्ते सन २००२-२०२१ च्या विकास आराखडा अंतर्गत असून सदरचा रस्ता वाहतुकीस अयोग्य असल्याने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाची बससेवा (एस.टी.बस) सुरु होत नसल्याचे माहे जुलै,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या रस्त्याचे डांबरीकरण व मजबूतीकरणाचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.

ओझर ते कातवड या रस्त्यावर बारमाही एस.टी. वाहतूक सुरु आहे.

(२) रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ नुसार सदर रस्त्याचे नाव प्रमुख जिल्हा मार्ग ४ पासून ओझर खैदा साळकुंभा कुर्ले भाटले नांदरुख मार्ग असे असून तो ग्रामीण मार्ग क्र.२४६ दर्जाचा आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी ८ कि.मी. असून ओझर ते कातवड हा भाग सा.क्र.०/०० ते ३/४०० मध्ये येतो. यापैकी सा.क्र. ०/०० ते ०/२०० व सा.क्र.१/४०० ते ३/४०० या लांबीचा पृष्ठभाग सुस्थितीत आहे. सा.क्र.०/२०० ते ०/३३८ या पृष्ठभागाच्या दुरुस्तीकरिता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत रु.५.०० लक्ष इतक्या किंमतीचे काम मंजूर असून प्रगतीत आहे. उर्वरित सा.क्र.०/३३८ ते १/४०० या लांबीचे डांबरीकरणाचे काम रस्ते व पूल दुरुस्तीच्या विविध योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाचारो-भडगांव (जि.जळगावं) तालुक्यामधील रस्त्यांनां मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत विशेष बाब म्हणून समाविष्ट करण्याबाबत

**(३३) ७३९०७ (०५-०३-२०२४). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत पाचारो-भडगांव तालुक्यातील (जि.जळगावं) रस्ते सन २०२३-२४ मध्ये बांबरड-लाख-सांगवी तांडा–मोहाडी-सांगवी–वरखेडी (ग्रामा १२६, ग्रामा ७७, ग्रामा २६, ग्रामा १०९, ग्रामा-५०) व अंतुर्ली फाटा-पुनगांव-मांडकी-ओझर-भातखंडे-दुसखेडा-बहुळेश्वर–नांद्रा-कुरंगी-लासगांव (इजिमा ५७, ग्रामा ३२, ग्रामा ०१, ग्रामा ५८,ग्रामा.८६) या रस्त्यांचा विशेष बाब म्हणून समाविष्ट करणेबाबतचा प्रस्ताव दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास अप्पर मुख्य सचिव (ग्रामविकास), मंत्रालय यांना सादर करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय, तसेच यावर शासनाने कोणता निर्णय

घेतला आहे वा त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-०५-२०२४) :** (१) व (२) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग रस्ते दर्जोन्नतीसाठी १०,००० कि.मी . इतक्या लांबीचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. सदर उद्दिष्टापैकी नियमित ७००० कि.मी. लांबीचे रस्ते जिल्हानिहाय वाटप करण्यात आलेले आहे व ३०% लांबी संशोधन व विकास अंतर्गत मंजुर करण्यात आली आहे. त्यानुसार ३०% म्हणजेच ३,००० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून ई-निविदा स्विकृती करण्यात आली आहे. प्रश्नाधीन रस्त्यांपैकी बहुतांश रस्ते हे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या कोअर नेटवर्क मध्ये समाविष्ट नसल्याने त्यांबाबत कार्यवाही प्रस्तावित करता येणार नाही तसेच यास्तव प्रश्नाधीन रस्त्यांबाबत नियमित उद्दिष्टांतर्गत तसेच संशोधन व विकास अंतर्गत निवडीकरीता प्रचलित धोरण,उपलब्ध निधी व प्राथम्यक्रमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## सहस्त्रकुंड (जि.यवतमाळ) पासून १०० मीटरच्या अंतरावर बांधण्यात येणाऱ्या विशाल रिसॉर्टचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३४) ७४०३८ (२९-०२-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहस्त्रकुंड (जि.यवतमाळ) पासून १०० मीटरच्या अंतरावर पैनगंगेच्या तिरावर बांधण्यात येणाऱ्या विशाल रिसॉर्टचे काम अद्यापी प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पर्यटनाला चालना देणाऱ्या रिसॉर्टचे काम बंद असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुसार उक्त रिसॉर्टचे काम सुरु करुन पर्यटनाचा विकास करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन २०१९-२० मध्ये उद्भवलेल्या कोविड-१९ या महामारीच्या प्रभावामुळे कामे पुर्ण करण्यास विलंब झाला.
(३) कोविड-१९ या महामारीच्या प्रभावामुळे विलंब झालेली कामे पुर्ण करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. तसेच दुसऱ्या टप्यातील कामांसाठी रु.४९९.५४ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून निधी वितरणाची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील मुख्यमंत्री आणि पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत ४३४ कोटी निधी मंजूर करण्यात आल्याबाबत

**(३५) ७४१२६ (०७-०३-२०२४). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील ग्रामस्थांचा प्रवास सुलभ व्हावा याकरीता सन २०१५ ते २०२० या ५ वर्षात मुख्यमंत्री आणि पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत १७९ रस्ते मंजूर करुन त्याकरीता ४३४ कोटी निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मंजूर रस्त्यांपैकी अनेक रस्त्यांवर अजूनही खड्डे पडलेले आहेत तर काही ठिकाणी साईडपट्या भरण्यात आलेल्या नाहीत तसेच पूर्णत्वाचा दिनांक फलकावर वेगळा आणि अभिलेख्यांमध्ये वेगळा असल्याचेही

निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सर्व मंजूर रस्त्याच्या कामाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आहे, त्यानुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-०५-२०२४) :** (१) व (२) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतर्गत १७९ कामे मंजुर असून त्यापैकी १३७ कामे पुर्ण झाली आहेत. पुर्ण झालेल्या १२८ रस्त्यांची कामाची दोष दायित्व कालावधीतील खड्डे व इतर दुरूस्तीबाबत कामे करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जिंतूर (जि.परभणी) पंचायत समितीच्या कार्यालयाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३६) ७४६५५ (०७-०३-२०२४). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिंतूर (जि.परभणी) पंचायत समितीच्या कार्यालयाची पावसाळ्यात वारंवार छतगळती होत असल्याने तेथील कर्मचाऱ्यांना काम करण्यास अनेक अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यालयाच्या छत दुरुस्तीसाठी दरवर्षी लाखो रुपयांचा खर्च होत असूनही छताच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे पावसाळयात दरवर्षी येथे छतगळती होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर कार्यालयाच्या परिसरात पावसाळ्यात पाणी साचल्याने नागरिकांचीही गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने पंचायत समितीच्या कार्यालयाचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०४-२०२४) :** (१), (२), (३) व (४) ग्राम विकास विभागाच्या दिनांक १५ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये, पंचायत समिती, जिंतूर (जि.परभणी) येथील नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या रु.९९९.२५ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भंडारा येथे वैनगंगा नदीच्या तीरावर कारधा पुलाजवळील परिसराचे सुशोभिकरणास निधी मिळणेबाबत

**(३७) ७४६७१ (२९-०२-२०२४). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा विधानसभा क्षेत्रातील वैनगंगा नदीच्या तीरावर कारधा पुला जवळील परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी रुपये ४५.१८ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत सदर परिसराचे सुशोभिकरण करण्याचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री यांनी तात्काळ संबंधित विभागास सादर करण्याच्या सूचना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावास पर्यटन विभागाकडून अक्षम्य दिरंगाई होत असून प्रादेशिक पर्यटन विभागाने मा. मुख्यमंत्री यांच्या सूचनेस अद्यापही प्रतिसाद दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पर्यटन विभागाने प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून प्रस्ताव व मंजुरीची कार्यवाही का करण्यात आली नाही या संबंधी स्थानिक लोकप्रतिनिधींना कळविले आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांवर सदर प्रस्तावास होत असलेल्या दिरंगाई बाबत शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०४-२०२४) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे,
वैनगंगा तीरावर व कारधा पुलाजवळील परिसराचे सुशोभिकरण करणे या प्रस्तावाची छाननी/ तपासणी करुन शासनास सादर करण्याबाबतची कार्यवाही पर्यटन संचालनालय स्तरावर सुरु आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत टाकळीभान (ता.श्रीरामपूर, जि. अहमदनगर) येथील शासकीय भूखंडाची विनापरवानगी विक्री केल्याबाबत**

**(३८) ७५९१९ (११-०३-२०२४). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायत टाकळीभान (ता.श्रीरामपूर, जि. अहमदनगर) येथील शासकीय भूखंडाची शासनाकडून परवानगी न घेता ग्रामपंचायतीने खाजगी व्यावसायिकास हस्तांतरण अथवा विक्री केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीच्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी या शासकीय जमिनीच्या व्यवहारातून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी ग्रामस्थांनी आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, संबंधित तहसिलदार, गट विकास अधिकारी व ग्रामपंचायत यांनी त्या जागेवर दोन मजली व्यावसायिक इमारत बांधकाम विनापरवानगी होऊ दिली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरच्या व्यावसायिकाने मा. न्यायालयातून कारवाईला स्थगिती मिळवून तेथे व्यवसायही सुरू केला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१८-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे,
(२) हे खरे नाही,
(३) हे खरे नाही,
(४) हे खरे आहे.
(५) सदर अतिक्रमण प्रकरणी अतिक्रमणधारक यांनी मा.न्यायालयात दावा दाखल केला आहे. प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यामधील राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांना देय असलेले अनुदान विनाविलंब अदा करण्याबाबत**

**(३९) ७६३३७ (१२-०३-२०२४). श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यामधील राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रमांतर्गत पूर्ण केलेल्या बायोगॅसचे लाखो रुपयांचे अनुदान मागील दोन वर्षापासून थकित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या २० कलमी योजनेंतर्गत ग्रामीण भागात राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम राबविला जातो, पंचायत समितीमार्फत याचे प्रबोधन केले जाते, यामध्ये लाभार्थ्यांने स्वतःचे आर्थिक भांडवल गुंतवणूक करुन त्याच्या क्षमतेनुसार आकाराचा बायोगॅस बांधणे आवश्यक असते, त्यानुसार इस्लामपूर (जि.सांगली) तालुक्यातील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी बँका, पतसंस्था यामधून कर्ज काढून पैशाची जुळवाजुळवी करीत बायोगॅसची उभारणी केली, परंतु एक वर्षापासून आजमितीस अनुदान जमा झालेले नाही, अनुदान मिळेल या आशेने शेतकरी गेल्या एक वर्षापासून पंचायत समितीकडे पाठपुरावा करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील दोन वर्षात एकूण किती बायोगॅस पूर्ण करण्यात आले व त्यांची अनुदानाची एकूण किती रक्कम शिल्लक आहे या योजनांच्या लाभार्थ्यांना अनुदानाचा लाभ अद्याप न मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शेतकऱ्यांनी वेगवेगळया ठिकाणांहून व्याजाने पैसे काढून हे बायोगॅस पूर्ण करुन घेतले आहेत, त्यामुळे मागील दोन वर्षाचे थकीत कालावधीचे व्याज शासन लाभार्थींना देणार आहे काय, किती दिवसांत ही सर्व रक्कम लाभधारकांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू लाभार्थ्यांना देय असलेले अनुदान विनाविलंब अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०४-२०२४) :** (१) होय.

(२) होय.

(३) सन २०२२-२३ मध्ये १९१ बायोगॅसचे अनुदानाअभावी रक्कम रु.२९,६८,८००/- इतकी देय आहे. केंद्र शासनाकडुन निधी प्राप्त नसल्यामुळे लाभार्थ्यांना अनुदानाचा लाभ दिला नाही.

सन २०२३-२४ मध्ये १०७ लाभार्थी पैकी माहे फेब्रुवारी २०२४ अखरे ९३ लाभार्थ्यांनी बायोगॅस संयंत्र बांधकाम पुर्ण केले आहे. देय अनुदान र.रु.१३,४२,०००/- इतकी देय आहे.

(४) केंद्र शासनाकडुन निधीबाबत पाठपुरावा करण्यात येत असुन निधी प्राप्त झाल्यानंतर लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात येईल.

(५) सदरचे अनुदान मिळणे कामी केंद्र शासनाला पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

(६) केंद्र शासनाकडून अनुदान उपलब्ध न झाल्यामुळे लाभार्थ्यांना अनुदान देणे प्रलंबित आहे.

---

**मौजे वायंगणी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायत अंतर्गत रस्त्यांच्या कामास जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून विलंब होत असल्याबाबत**

**(४०) ७६५०५ (०७-०३-२०२४). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वायंगणी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायत अंतर्गत रस्त्यांच्या कामास जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत वायंगणी ताम्हणकर वाडी ग्रा.मा.-१७ या कामास रुपये १५ लक्ष व रुपये १० लक्षाची मंजुरी देण्यात आली असून याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांच्याकडे दिनांक

१७ ऑगस्ट, २०२३ रोजी  वा त्यासुमारास ई-मेल द्वारे पत्र पाठवून लोकप्रतिनिधिनी मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वायंगणी ताम्हणकर वाडी ग्रा.मा.-१७ या कामांची निविदा प्रक्रिया होऊन ५ महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरी अद्याप कार्यारंभ आदेश दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एखाद्या लोकप्रतिनिधी यांनी सार्वजनिक बाबींची माहिती मागितली असता शासन निर्णयानुसार ७ दिवसांच्या आत त्या पत्रांची पोच व माहिती तसेच दोन महिन्यांच्या आत याबाबत अहवाल देणे आवश्यक असताना सदर पत्राला कोणत्याही प्रकारचे पोच किंवा माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही, हे ही खरे आहे काय, माहिती न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, ग्रामपंचायत वायंगणी सदर कामांची ग्रामपंचायतीकडे  वर्ग करण्याची मागणी केलेली असताना ग्रामपंचायतीकडे कामे वर्ग केली नाहीत, हे ही खरे आहे काय, कामे वर्ग न करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वायंगणी ताम्हणकर वाडी ग्रा.मा.-१७ या कामाचा कार्यारंभ आदेश देऊन सदर काम सुरु करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मा.विधानसभा सदस्य यांचे पत्र ई-मेल द्वारा जिल्हा परिषदेस प्राप्त झाल्यानंतर त्यांचे स्वीय सहायकांच्या विनंतीनुसार उक्त पत्राच्या अनुषंगाने माहिती जिल्हा परिषदेद्वारे स्वीय सहायकांच्या भ्रमणध्वनीवर पाठविण्यात आली आहे.  तथापि सदर माहिती लेखी स्वरुपात मा.विधानसभा सदस्य यांना अनावधानाने विहीत मुदतीत पाठविण्याचे राहून गेले असल्यामुळे दि.२३.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषदेने मा.विधानसभा सदस्य यांना सदर माहिती कळविली आहे.
(४) प्रशासकीय मान्यता आदेशातील अटी व शर्तीनुसार ग्रामपंचायतीने विहीत मुदतीमध्ये मुक्ता मागणी कागदपत्रांसह प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे सादर केला नसल्यामुळे सदर कामे ग्रामपंचायतीकडे वर्ग केलेली नाहीत.
(५) रस्ते विकास आराखडा सन २००१-२१ नुसार प्रजिमा क्र.१ ते वायंगणी गावठाणवाडी ताम्हणकरवाडी रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१७ दर्जाचा आहे.

सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत सन २०२२-२३ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रु.१५.०० लक्ष व रु.१०.०० लक्षची कामे मंजूर असून सदर दोन्ही कामांचे कार्यारंभ आदेश माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये जिल्हा परिषदेमार्फत निर्गमित करण्यात आलेले आहेत.  सदर दोन्ही कामे जिल्हा परिषदेमार्फत दि.१५.०१.२०२४ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाणगांव (ता. डहाणू, जिल्हा पालघर) ग्रामपंचायती अंतर्गत सन २०२१-२०२२ मध्ये अपात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेअंतर्गत लाभ दिल्याबाबत**

**(४१) ७६६५५ (०७-०३-२०२४). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाणगांव (ता. डहाणू, जिल्हा पालघर) ग्रामपंचायतीअंतर्गत सन २०२१-२०२२ मध्ये एकूण ७८ लाभार्थ्यांना घरकुल योजना मंजूर करण्यात येऊनही जिल्हापरिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांनी श्रीमती केतकी राऊत,ग्रामविकास अधिकारी यांच्या संगनमताने घरकुल योजनेतून १९ अपात्र लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतच्या अनेक तक्रारी ग्रामस्थांनी देऊनही या प्रकरणी दोन वर्षांचा कालावधी होवूनही उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचेकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रकरणी कारवाई करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या हद्दीत कचरा व्यवस्थापन करण्यासाठी डम्पिंग ग्राऊंड नसल्याबाबत

**(४२) ७६८६६ (११-०३-२०२४). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील ११० ग्रामपंचायतींच्या हद्दीतील गावागावांत व महत्वाच्या ठिकाणी व महामार्गालगत कचऱ्यांचे ढीग पडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यासाठी अथवा कचरा व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीकडे एकही डम्पिंग ग्राऊंड नसल्याने दररोज निर्माण होणारा कचरा चेरपोली, करंजपाडा टाकण्याची वेळ ग्रामस्थांवर येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तेथील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्यामुळे जिल्हा परिषद, ठाणे व पंचायत समिती, शहापूर प्रशासनाने त्यासाठी शासनाकडे (महसूल विभाग) १० एकर जागेची मागणी केली असून त्याबाबतची नस्ती (फाईल) शासनाकडे अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१८-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) होय, अंशत: खरे आहे,
(३) हे खरे नाही.

शहापूर तालुक्यातील रोड लगत वाढीव लोकसंख्या असलेल्या १९ गावांना वन विभागाची अथवा शासकीय १० एकर जागा सर्व्हे क्र. १७४ शासकीय जागा / ६८६ वन विभागाची जागा घनकचरा व्यवस्थापानासाठी मिळणे बाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहापूर यांनी दि. १५/११/२०२३ अन्वये रोजी तहसीलदार व वन विभाग यांचे कार्यालयास मागणी केली आहे. ठाणे जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गलगतअसलेल्या ८० गावांमधील घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन विभाग, जिल्हाधिकारी, ठाणे मार्फत रु.४.४८ कोटी व जिल्हा परिषद, ठाणे मार्फत रु.०.५० कोटी असे ४.९८कोटी तरतूद केली आहे.जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग लागतच्या ८० ग्रामपंचायतीच्या घनकचरा व्यवस्थापनाचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील दुर्गापूर (सं.) ग्रामपंचायत ऊर्जानगर वार्ड नं.१ येथील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४३) ७७१८३ (११-०३-२०२४). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील दुर्गापूर (सं.) ग्रामपंचायत ऊर्जानगर वार्ड नं.१ येथील नाली, रोड स्ट्रीट लाईट या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत त्रस्त झालेल्या स्थानिकांनी नाली, रोड स्ट्रीट लाईटचा रस्ता दुरुस्त करण्याबाबतचे निवेदन ग्रामपंचायत, ऊर्जानगर यांना दिले, परंतू याकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने स्थानिकांनी पैसे जमा करुन तात्पुरता रोड तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चंद्रपूर जिल्हयातील दुर्गापूर (सं.) ग्रामपंचायत ऊर्जानगर वार्ड नं.१ येथील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. ग्रामपंचायत ऊर्जानगर येथील नागरीकांनी निवेदन सादर केले होते. परंतू, तेथील नागरीकांनी पैसे जमा करून तात्पुरता रोड तयार केलेला नाही.
(३) चंद्रपूर जिल्हयातील ग्रामपंचायत दुर्गापूर येथील नागरीकांनी कुठलेही निवेदन सादर केलेले नाही, तसेच ग्रामपंचायत ऊर्जानगर येथील नागरीकांनी निवेदन सादर केले आहे. परंतु तेथील नागरीकांनी पैसे जमा करून तात्पुरता रोड तयार केलेला नाही. निवेदनाचे अनुषंगाने ग्रामपंचायत ऊर्जानगर यांनी ऊर्जानगर अंतर्गत नेरी गावातील रु.२०.०० लक्ष व रु.१२.०० लक्ष रक्कमेच्या कामांबाबत दिनांक १३/९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये पंचायत समिती चंद्रपूरला प्रस्ताव सादर केला होता. परंतू, त्यामध्ये काही त्रुटीची पुर्तता करून सुधारीत प्रस्ताव दिनांक ४/१२/२०२३ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चंद्रपूर यांना प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावानुसार सन २०२३-२४ या वर्षात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत कामे मंजूरी करीता प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली/बुलढाणा तालुक्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ चे कोअर नेटवर्क अद्ययावत करणेबाबत**

**(४४) ७७२४३ (११-०३-२०२४). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली विधानसभा मतदार संघातील अनेक दोन गावांना जोडणारे रस्ते योजनेत समाविष्ट नसल्याने अनेक गावांना जाण्यासाठी रस्ते नव्हते. त्यामुळे चिखली आणि बुलढाणा तालुक्यांतील अनेक रस्ते संदर्भ क्र.१ व २ नुसार बरेच योजना बाह्य रस्ते हे नव्याने ग्रामीण मार्ग म्हणून रस्ते विकास योजना सन २००१-२१ मध्ये दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२३ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णयानुसार समाविष्ठ झालेले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ साठीचे कोअर नेटवर्क हे २०२२ मध्ये अंतीम झालेले आहे. त्यामुळे नव्याने योजनेत समाविष्ठ रस्ते कोअर नेटवर्क आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, नव्याने योजनेत समाविष्ठरस्ते अगोदरच दोन गावांना जोडणारे असले तरी त्यावर आतापर्यंत कोणतेही काम झालेले नसल्याने नवीन समाविष्ठ झालेल्या रस्त्यांची अवस्था अत्यंत ,वाईट झाली आहे. त्यामुळे रस्ते विकास योजनेत नव्याने समाविष्ठ झालेले चिखली विधान सभा मतदार संघातील ग्रामीण मार्ग मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या टप्पा-२

च्या कोअर नेटवर्क मध्ये समाविष्ठ करुन कोअर नेटर्वक अदयावत करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पालकमंत्री बुलडाणा जिल्हा यांचे मार्फत ग्राम विकास मंत्री यांचेकडे दिनांक २५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास केली हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-०५-२०२४) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) विभागाच्या दि.०६.०१.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या टप्पा-२ राबविण्यात येत आहे.सदरहू योजनेच्या अंमलबजावणीसाठी नवीन कोअर नेटवर्क तयार करून रस्ते निवडीबाबत सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.यास्तव सदरहू प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**मराठवाडा वॉटर ग्रीड योजना सुरु करणेबाबत**

**(४५) ७७२५६ (२९-०२-२०२४). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा वॉटर ग्रीड हा मराठवाडयासाठी संजीवनी देणारा प्रकल्प असून मागील काळात प्रलंबित असलेला हा प्रकल्प नव्याने सुरु करण्यात येईल, हे खरेआहे काय,
(२) असल्यास, मराठवाडयातील मोठ्या प्रकल्पांना व धरणांना जोडून मराठवाडा वॉटर ग्रीडच्या माध्यमातून पिण्याचे पाणी, शेतीला पाणी व उद्योगाला पाणी मिळणे शक्य आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी दुष्काळाचे गंभीर सावट असून मराठवाडा वॉटर ग्रीडच्या माध्यमातून मराठवाड्यातील दुष्काळ कायमस्वरूपी संपले अशी शासनाची धारणा आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पासाठी सुमारे ४० हजार कोटी रुपये एवढा निधी शासन उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१९-०६-२०२४) :** (१) होय हे अंशतः खरे आहे.
(२) होय हे अंशतः खरे आहे.
(३) होय हे अंशतः खरे आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मराठवाडयातील जालना, छत्रपती संभाजीनगर, परभणी, लातूर व नांदेड या जिल्ह्यातील एकूण ११ ग्रीड पाणी पुरवठा योजनेंतर्गत एकूण १४८७ गावांचा समावेश आहे. सदर ११ ग्रीड पाणी पुरवठा योजनेंतर्गतची कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) सदर प्रकरणी चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र राज्य यांचेस्तरावरील दि. १८.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मा. मंत्री, जलशक्ती मंत्रालय यांना राष्ट्रीय जल जीवन मिशन अंतर्गत (NJJM) मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पांतर्गत ८ जिल्ह्यांसाठी रू. २९००० कोटी किंमतीच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्याची विनंती केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बिनविरोधी निवडणूका झालेल्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन निधी देण्याबाबत

**(४६) ७७६८२ (११-०३-२०२४) डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गावपातपळीवर वाद-विवाद सलोख्याचे वातावरण निर्माण व्हावे, या उद्देशाने माहे डिसेंबर, २०२० मध्ये राज्य शासनाने ग्रामपंचायतीच्या निवडणूका जर बिनविरोधी झाल्या तर त्यांना प्रोत्साहन म्हणून रुपये २५ लाखापर्यंत निधी देण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) तसेच परभणी जिल्ह्यातील ५४ ग्रामपंचायतींच्या निवडणुका बिनविरोधी होऊनही गेल्या अडीच वर्षांच्या काळात त्यांना अद्यापपर्यंत सदर प्रोत्साहन निधी मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन प्रशासकीय स्तरावर कुठलेच आदेश किंवा सूचना नसल्याचे स्थानिक प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

४) असल्यास, याबाबत सदर प्रकरणी चौकशी करुन बिनविरोधी निवडणूका झालेल्या ग्रामपंचायतींना तातडीने प्रोत्साहन निधी देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०४-२०२४) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२), (३), (४), व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दौंड (जि. पुणे) तालुक्यातील प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतील प्रस्तावांना मान्यता मिळणेबाबत

**(४८) ७७७७९ (०१-०३-२०२४) ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील केडगाव, पिंपळगाव, शिरापूर, कुसेगाव व पाटस येथील प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतील प्रस्तावांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास सादर केला असून, सद्य:स्थितीत सदर प्रस्ताव उपसचिव, पर्यटन यांचेकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त प्रस्तावांना मान्यता मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर प्रस्तावास पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय दि.१० नोव्हेंबर, २०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जिल्हा परिषद, बीड यांनी स्वनिधी योजनेंतर्गत ग्रामीण भागातील भजनी मंडळांना भजनी साहित्य संच पुरविण्याबाबत

**(४८) ७८२४३ (२०-०२-२०२४) श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद, बीड यांनी स्वनिधी योजनेंतर्गत ग्रामीण भागातील भजनी मंडळांना भजनी साहित्य संच पुरविण्यासाठी तरतूद करून सर्व गटविकास अधिकारी यांचेकडून त्वरित प्रस्ताव मागवून मंजूरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (केज मतदार संघ) यांनी मुख्यकार्यकारीअधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचेकडे दिनांक १७ नोव्हेंबर,

२०२३ रोजी वा त्यासुमार निवेदनाद्वारे केली आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर प्रकरणी किती रुपयांची तरतूद केली वा किती प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ग्रामविकास विभागाच्या दि.२०/१०/१९९९ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी त्यांच्या स्वउत्पन्नातून ग्रामीण भागातील फक्त मागासवर्गीय लाभार्थ्यांच्या उन्नतीकरीता २०% रक्कमेतून वैयक्तिक व सामुहिक योजनेमध्ये भजनी मंडळांना भजनी साहित्य संच पुरविणे बाबतच्या योजनेचा समावेश नसल्याबाबत दि.१४/३/२०२४ च्या पत्रान्वये बीड जिल्हा परिषद कार्यालयाने मा.विधानसभा सदस्य यांना कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिंचोलीमाळी (ता. केज, जि. बीड) येथील बंदिस्त नाल्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असल्याबाबत

**(४९) ७८६९४ (२०-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंचोलीमाळी (ता. केज, जि. बीड) येथील ग्रामपंचायती अंतर्गत १५ व्या वित्त आयोगामार्फत वार्ड.क्र.०१ मध्ये बंदिस्त नाल्याचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नाल्याचे काम निकृष्ठ दर्जाचे करण्यात येत असल्याची तक्रार नागरिकांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी त्वरित चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री, ग्रामविकास यांच्याकडे दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.

चिंचोली माळी (ता. केज जि. बीड) येथील ग्रामपंचायत अंतर्गत १५ व्या वित्त आयोगामार्फत वार्ड क्र.०१ मध्ये बंदिस्त नाल्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

सदर नाल्याचे काम निकृष्ठ दर्जाचे करण्यात येत असल्याची तक्रार नागरिकांनी गट विकास अधिकारी यांचेकडे प्रथम केलेली नाही, मा. लोकप्रतिनिधीकडे करण्यात आलेली असुन मा. लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा परिषद, बीड या कार्यालयाकडे तक्रार केलेली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २० नोव्हेंबर, २०२३ रोजी मा. मंत्री, ग्रामविकास यांच्याकडे सदर प्रकरणी त्वरित चौकशी करून कार्यवाही करण्याबातची मागणी केलेली नसून सचिव, ग्रामविकास विभाग व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड कार्यालयाकडे तक्रार केलेली आहे.

(४ ) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणात जिल्हा परिषद, बीड यांचे पत्र क्र. ७६६८ दि.२०.११.२०२३ व पत्र क्र. ३७० दि. १९/०१/२०२४ च्या पत्रान्वये गट विकास अधिकारी यांचे कडे चौकशी अहवाल मागविण्यात आला होता. गट विकास

अधिकारी यांनी पत्र क्र. ८०५ दि. २९/०२/२०२४ रोजीच्या पत्रासोबत चौकशी अहवाल सादर केला आहे. चौकशी मध्ये कामाची पाहणी व तपासणी केल्यानुसार काम अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे केलेले असुन क्रॉकीट पाईपला स्वतःचे सॉकेट असुन त्यामुळे त्याला क्रॉकीटनुसार जाईट करणे गरजेचे नाही. तसेच अंदाजपत्रकात बेड कॉक्रिटची तरतूद नसल्याने पाईपच्या खाली बेड कॉक्रीट करण्यात आलेले नाही. दोन्ही नालीचे काम हे अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे करण्यात आलेले आहे. त्यामुळे रस्त्यावर कुठेच गाळ आढळुन आलेले नाही.
(५) विलंब झालेला नाही.

---

**सोनवळा (ता. अंबाजोगाई) या गावात स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(५०) ७८८१७ (२०-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोनवळा (ता. अंबाजोगाई) या गावात गट क्र. 238 मधील उर्वरित क्षेत्रातून दलित समाज वगळून इतर सर्व समाजासाठी स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी विहित नमून्यातील अ,ब,क,ड, माहितीसह परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई यांना कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्ताव त्वरित तयार करून सादर करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई यांचेकडे दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमार निवेदन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवदेनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
दलित समाज स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध असून इतर समाजासाठी जागा उपलब्ध नाही.
(२) हे खरे आहे.
(३) विहित नमुन्यातील प्रस्ताव पंचायत समिती, अंबाजोगाई यांचे दि.०८/११/२०२३ चे पत्रान्वये तहसीलदार, अंबाजोगाई यांना आवश्यक कार्यवाही सादर करण्यात आला असून,जागेची मोजणी भूमी अभिलेख कार्यालय व महसूल विभाग, अंबाजोगाई यांनी केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.